# प्रकरण पहिले

## डॉ. आप्पासाहेब पवार

## जीवन चरित्र (धावता आढावा)

प्र क र ण -- प हि ले

डॉ. आप्पासाहेब पवार : जीवन चरित्र

(धावता आढावा)

थोर शिक्षणतज्ञ, कार्यक्षम व यशस्वी प्रशासक, इतिहासाचे गाढे अभ्यासक व संशोधक, शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु व शिल्पकार म्हणून डॉ. आप्पासाहेब पवार (1906 ते 1981) यांचे नाव संपूर्ण महाराष्ट्राला सुपरिचित आहे.

या शोधनिबंधात डॉ. आप्पासाहेब पवार यांचे जीवन आणि कार्य किती महत्वाचे, भरीव व मूलगामी होते, हे सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न संशोधिकेने केला आहे. या शोधनिबंधासाठी संशोधिकेने सर्व मूळ कागदपत्रे अभ्यासली आहेत. त्यात शिवाजी विद्यापीठाचे वार्षिक अहवाल, शिवसंदेश त्रैमासिक, डॉ. आप्पासाहेब पवार यांची भाषणे, त्यांनी इतर लोकांशी केलेला पत्रव्यवहार, भारत इतिहास संशोधन मंडळाची त्रैमासिके, Proceeding of Indian History Congress मध्ये त्यांनी लिहिलेले लेख, कोल्हापूरच्या शाहू संशोधन केंद्रातील त्यांचा ग्रंथसंग्रह, त्यांनी संपादित केलेले ऐतिहासिक कागदपत्रांचे खंड (उदा. ताराबाईकालीन कागदपत्रे खंड पहिला, दुसरा व तिसरा, जिजाबाई कालीन कागदपत्रे खंड पहिला, Tarabai Papers - A collection of Persian Letters, Studies in Maratha History Vol. I and II, Chhatrapati Rajarshi Shahu Maharaj Papers Vol.I), Maratha History Seminar Papers, Studies in Indian History, Dr.A.G. Pawar - Felicitation Volume Edited by Dr.V.D. Rao.

राजाराम महाविद्यालयातील राजारामीय वार्षिक अंक, दैनिक पुढारी, दैनिक सत्यवादी, या वर्तमानपत्रांच्या फाईल्स, पुणे येथील दैनिक केसरी-मराठा कात्रणसंग्रह, एस्.एस्.सी. बोर्डातील आवश्यक ते रेकॉर्ड, इ. चा समावेश आहे.

कोल्हापूरच्या मातीत कसदार, गुणवान आणि कर्तबगार माणसे घडविण्याचा गुणधर्म आहे. डॉ. आप्पासाहेब पवार हे याच कोल्हापूर नगरीचे सुपुत्र होत. करवीर नगरीने जसे कलावंत घडविले, पैलवान तयार केले, तसे अनेक विव्दानही देशाला दिलेले आहेत. ज्या अगाध विव्दतेपुढे आणि कल्पक कर्तृत्वापुढे मान नम्रपणे झुकावी, असेच डॉ. आप्पासाहेब पवार हे एक महान व्यक्तिमत्व होऊन गेले. ते ज्या ज्या क्षेत्रात गेले, त्या त्या क्षेत्रात त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे.

परिस्थितीची आव्हाने प्रत्येक माणसापुढे उभी राहत असतात. जी माणसे ही आव्हाने आनंदाने स्वीकारतात, ती कर्तृत्वसंपन्न होतात. पण काही कर्तृत्ववान माणसे आपले कर्तृत्व समाजासाठी, देशासाठी राबवितात. त्यांचा यात वैयक्तिक विकास तर झालेलाच असतो, पण समाजाला ते विशाल क्षितिजाचे दर्शन घडवितात. ते समाजाचा "आदर्श" बनतात. डॉ. आप्पासाहेब पवार यांचे चैतन्यमय, कर्तृत्ववान, स्फुर्तिदायक जीवन या श्रेष्ठ दर्जाचे निश्चितच मानावे लागेल.

राजर्षि छत्रपती शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या उत्थानासाठी अनेक क्षेत्रात विविध उपक्रम राबविले. शिक्षण क्षेत्र हे त्यापैकीच एक आहे. शाहूंच्या या कार्यामुळेच गणपतराव पवार या शेतक–याचा मुलगा आप्पासाहेब पवार हा पदवीधर झाला. त्याने शिक्षणक्षेत्रातील अ–त्युच्च पदव्या मिळविल्या. अनेक उच्च पदे भूषविली. बहुजन समाजाला सदैव स्फूर्ती देईल, त्यांचा आत्मविश्वास वाढवेल, त्यांना विधायक दिशा दाखविल, त्यांच्यात कर्तृत्वप्रेरणा निर्माण करील, असेच डॉ. आप्पासाहेब पवार यांचे जीवन आणि कार्य आहे.

**पवार घराणे :–**

डॉ. आप्पासाहेब पवार यांचे पूर्वज कोल्हापूर संस्थानातील भूदरगडाचे गडकरी होते.[1] ते गारगोटी भूदरगडाच्या बंडात (1846) सामील झाले. पण बंड मोडताच त्यांना परागंदा व्हावे लागले. त्यामुळे डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या वडीलांना – गणपतरावाना गाव सोडून बेळगावला आसरा घ्यावा लागला व शेती व्यवसाय पत्करावा लागला. यावरून त्यांचे पूर्वज ख–या अर्थाने भूदरगडचे रहिवासी म्हणजेच कोल्हापूर जिल्हयाचे नागरिक होते, हेच सिद्ध होते. त्यांचे वडील कोल्हापूरात सनदी वकील म्हणून वकीली करीत असताना बरेच दिवस आपले आडनाव "गारगोटी" असे लावीत होते. बरेच लोक त्यावेळी त्यांना "गारगोटी वकील" म्हणून ओळखत होते.[2] पुढे त्यांचे पूर्वज बेळगांवहून मुचंडीला आले व तेथे स्थायिक झाले.[3]

डॉ. आप्पासाहेब पवार यांचा जन्म 5 मे 1906 इ. रोजी मुचंडी या छोटया खेडे गावात, एका शेतक-याच्या कुटुंबात झाला.[4] त्यांच्या वडीलांचे पूर्ण नाव गणपतराव बळवंतराव पवार आणि आईचे गंगाबाई गणपतराव पवार असे होते. गणपतराव पवार हे एक महत्वकांक्षी व सत्शील वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांनी केवळ प्राथमिक शिक्षण घेतलेले होते. पण कायदेशीर वकील म्हणून उमेदवारी मिळविण्यात ते यशस्वी झाले होते आणि बेळगाव जवळच्या वडगाव गावी – सध्याचे माधवपूर येथे – वकीली सुरु करायला ते पात्र बनले होते. 1912 मध्ये पवार कुटुंब मुचंडीहून वडगावला रहायला आले. पुढे 1925 मध्ये ते कुटुंब डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या शिक्षणासाठी कोल्हापूरला कायमचे स्थायिक झाले.[5]

<u>शिक्षण</u> :--

मुचंडी गावी शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे 1912 मध्ये पवार कुटुंब मुचंडीहून वडगावला आले. वडगावला आल्यानंतरच डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. त्यांचे प्राथमिक शिक्षण वडगावात -- कुरुंदवाड जहागिरीच्या गावात झाले. पण काही अपरिहार्य कारणामुळे त्यांना माध्यमिक शिक्षणासाठी परत बेळगावला आणले. बेळगाव जवळील शहापूरच्या चिंतामणराव हायस्कूलमध्ये त्यांचे नाव दाखल केले. मॅट्रीकपर्यंत गेल्यावर ते देवध्यानाला लागले. शाळा सोडून गणपत महाराजांच्या मठात जाऊन पोथी, पुराण, किर्तन ऐकण्यात ते दंग होऊ लागले. ईश्वरसेवा समजून मठाची साफसफाई करु लागले.

या घटनेमुळे त्यांचे वडील अतिशय बेचैन व दु:खी झाले. त्यांनी डॉ. आप्पासाहेब पवार यांना त्यातून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना ते शक्य झाले नाही. त्यामुळे त्यांनी हे काम आपल्या मित्राकडे -- बेळगावच्या 'राष्ट्रवीर' वृत्तपत्राचे संपादक श्री. शामराव देसाई यांच्याकडे सोपविले.

शामराव देसाई यांनी डॉ. आप्पासाहेब पवार यांचे मन महत्प्रयासाने शिक्षणाकडे वळविले. निव्वळ भजनाने काही मिळत नाही. श्रमाशिवाय या जीवनात काहीही पदरी पडत नाही, अभ्यासाशिवाय परीक्षा पास होता येत नाही. हे त्यांनी डॉ. आप्पासाहेब पवार यांना परोपरीने पटवून दिले. त्यांच्या मनात शाळेची, शिक्षणाची गोडी निर्माण केली. त्यामुळे डॉ. आप्पासाहेब पवार पुन्हा शाळेत जाऊ लागले. मनापासून अभ्यास करु लागले. ते पोथीकडून पुस्तकाकडे, परमार्थाकडून

शिक्षणाकडे वळले. याचाच परिणाम म्हणून त्यांनी 1924 ला मॅट्रीक परीक्षा उच्च श्रेणीत पूर्ण केली आणि हायस्कूलची स्कॉलरशिप मिळविली.[6] त्यामुळे त्यांच्या वडीलांना मोठा हुरुप आला, त्यांनी डॉ.आप्पासाहेब पवार यांना पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला पाठवायचे ठरविले.

डॉ. आप्पासाहेब पवार वडीलांच्या आग्रहावरुन पुढील शिक्षणासाठी कोल्हापूरला आले. त्यांनी आपले नाव राजाराम महाविद्यालयात घातले. त्यांच्या विद्वतेची चुणूक महाविद्यालयामध्येही ठळकपणे दिसून आली. ते एफ्.वाय्.बी.ए. ला फिजिक्स आणि इंग्रजी या दोन्ही विषयांत पहिले आले, त्यांना आल्फ्रेड शिष्यवृत्ती मिळाली.[7] त्यामुळे त्यांचा पुढील शिक्षणाचा मार्ग सुकर झाला.

त्यांनी बी.ए. ला ऐच्छिक विषय इतिहास – अर्थशास्त्र व राज्यशास्त्र हे घेतले होते. या विषयातील प्राविण्यामुळे ते प्रसिध्द इतिहास संशोधक, शिवचरित्रकार, शिवाजी विद्यापीठ कल्पनेचे आद्यप्रेरक, प्राचार्य डॉ. बाळकृष्ण यांच्या खास मर्जीत गेले. ते डॉ. बाळकृष्णांना अर्थशास्त्रातील शंका विचारत, पण काहीवेळा डॉ. बाळकृष्णांनाही त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देता येत नसत, त्यांच्या या अभ्यासूवृत्तीचा डॉ. बाळकृष्णांच्यावर खूपच प्रभाव पडलेला होता. ते डॉ.बाळकृष्णांचे आवडते विद्यार्थी होते.

एकदा डॉ. आप्पासाहेब पवार टायफॉईडने आजारी होते. त्यामुळे ते दोन–चार दिवस कॉलेजला गेले नव्हते. डॉ. बाळकृष्णांनी त्यांची चौकशी केली, ते आजारी असल्याचे समजताच, डॉ.बाळकृष्ण स्वतः त्यांच्या खोलीवर गेले. दरबार सर्जन डॉ. धनवडे यांना भेटून पेशंटची खास व्यवस्था केली. वेळोवेळी दवाखान्यात जाऊन पेशंटला धीर दिला. डॉ. बाळकृष्णांच्या या प्रयत्नांमुळेच डॉ. आप्पासाहेब पवार जीवावरच्या संकटातून वाचले.

महाविद्यालयीन जीवनात केवळ एक हुषार विद्यार्थी म्हणूनच ते परिचित होते असे नव्हे, तर त्यांच्यात नम्रता व सेवाभावीवृत्तीही होती. डॉ.बाळकृष्ण व भाई माधवराव बागल यांचे संबंध चांगले होते. डॉ.बाळकृष्णांच्यामुळेच भाई माधवराव बागल यांनी आपली काही ऑईल पेंटिंग्ज महाविद्यालयाला दिली होती. त्यांच्या आमंत्रणावरुन भाई माधवराव बागल आपल्या चित्रकार मित्रासह विशाळगडच्या सहलीला गेले होते. सहलीची व्यवस्था विशाळगडकरांनी केली होती. विशाळगडावर घोडी जाऊ शकली नाहीत. त्यामुळे सर्वांना चालत जावे लागले. भाई माधवराव बागल व त्यांचा मित्र चालून–चालून मेटाकुटीला आले. त्यांचे पाय उचलेनात. तो मित्र गडावर पोहोचताच धाडकन् सतरंजीवर आडवा झाला. त्याची केविलवाणी स्थिती सर्व विद्यार्थी पहात होते. पण डॉ. आप्पासाहेब

पवार एकटेच पुढे झाले व त्यांनी भाई माधवराव बागलांच्या मित्राचे पाय चेपण्यास सुरुवात केली. डॉ.आप्पासाहेब पवार यांच्या या सेवावृत्तीची आठवण तो मित्र अखेरपर्यंत काढत होता. सेवावृत्तीने माणूस कसा जिंकला जातो, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे. हा प्रसंग भाई माधवराव बागल यांनी त्यावेळच्या "हंटर" साप्ताहिकात प्रसिध्द केला होता. डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जडण--घडणीला महाविद्यालयीन जीवनातच सुरुवात झाली होती. उच्चारावरुन विव्दता, आवाजावरुन नम्रता आणि वर्तनावरुन माणसाचे शील समजते. याचे प्रत्यंतर डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या बाबतीत असे वारंवार येत होते.

ते 1928 साली इतिहास--अर्थशास्त्र व राज्यशास्त्र हे विषय घेऊन बी.ए. झाले. ते बी.ए. ची परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झाल्याने, त्यांना फेलोशिप मिळाली. त्यामुळे त्यांना एम्.ए., एल्.एल्.बी.चे कोर्सेस पूर्ण करता आले. त्यांना मुंबई सरकारची ही शिष्यवृत्ती होतीच. ते 1930 साली मुंबईहून एम्.ए. झाले.[8] एम्.ए. झाल्यावर, ते दुसऱ्यावर्षी म्हणजे 1931 साली पुण्याहून एल्एल्.बी. ही झाले.[9] कारण एम्.ए. होण्यापूर्वीच ते फर्स्ट एल्एल्.बी. झालेले होते.

आता त्यांचा उच्च शिक्षणासाठी विलायतेला जाण्याचा मार्ग मोकळा झाला. त्यांच्या विलायतेच्या खर्चाची बरीच मोठी जबाबदारी त्यांचे भावी सासरे बळवंतराव शिंदे यांनी स्वीकारली. कोल्हापूरातील ते एक सधन व्यापारी होते. 1931 च्या ऑगस्टमध्ये डॉ. आप्पासाहेब पवार उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला रवाना झाले.[10]

त्यांनी लंडन युनिव्हर्सिटीच्या 'स्कूल ऑफ ओरिएंटल स्टडीज' मध्ये पीएच्.डी. पदवी संपादन केली.[11] त्यांच्या प्रबंधाचा विषय **"शाहू छत्रपतींची अधिसत्ता – 1708 ते 1749"** हा होता. ते कायद्याचे पदवीधर होतेच. आता लंडनला आलोच आहोत, तेव्हा बॅरिस्टरही होऊन जावे, असे त्यांना वाटले. पण त्यासाठी 210 पौंड म्हणजे जवळ जवळ तीन हजार रुपये भरावे लागणार होते. ते पैसे त्यांच्याजवळ नव्हते. त्यांचे भावी सासरे बळवंतराव शिंदे यांनी त्यांना थोडे पैसे पाठवून दिले. त्याचवेळी डर्बी लॉटरीमध्ये त्यांना 100 पौंड मिळाले. या रकमेचा वापर त्यांनी बॅरिस्टर होण्यासाठी केला. पीएच्.डी. पदवी मिळवून व बॅरिस्टर होऊन, ते 1935 साली मायदेशी परत आले.[12]

डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या विलायतेच्या शिक्षणाचा बराचसा खर्च त्यांचे भावी सासरे बळवंतराव शिंदे यांनी केला असला तरी, कोल्हापूरचे छत्रपति राजाराम महाराज व बडोद्याचे श्रीमंत

सयाजीराव गायकवाड महाराज यांच्याकडून ही त्यांना आर्थिक मदत मिळाली.

डॉ. आप्पासाहेब पवार यांना वयाच्या 19 व्या वर्षीच त्यावेळच्या शिक्षणसंस्थेमार्फत आय्.सी.एस्.(Indian Civil Service) ला जाण्याची संधी मिळाली होती. या संधीचा फायदा घेण्यासाठी त्यांनी आवश्यक ती सर्व तयारी केली आणि आईची परवानगी मागितली. ते अतिशय आज्ञाधारी व मातृभक्त होते. त्यांच्या मनात वडीलांच्याविषयीही प्रेम होतेच. पण आईवर त्यांचे विशेष प्रेम होते. त्यांच्या आईनी त्यांना दूरदेशी पाठवायला विरोध केला. केवळ आईच्या नकारामुळेच ते त्यावेळी उच्च शिक्षणासाठी विलायतेला गेले नाहीत. पण आईच्या मृत्यूनंतर मात्र त्यांनी आपली ही इच्छा पूर्ण करुन घेतली.

त्यांची शैक्षणिक क्षेत्रातील तपस्या फार मोठी आहे. अत्यंत प्रतिकुल परिस्थितीशी झुंज देत, त्यांनी शिक्षण क्षेत्रातील एकाहून एक श्रेष्ठ व उच्च पदव्या संपादन केल्या. यावरुन त्यांची अभ्यासूवृत्ती, ध्येयनिष्ठा, कुशाग्र बुध्दीमत्ता व चिकाटी दिसून येते.

डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ज्ञानाचाच ध्यास घेतला होता आणि त्यांनी ते इतक्या तळमळीने व शीघ्रतेने मिळविले होते की, ज्ञानाच्या मागे ते लागले होते असे म्हणण्यापेक्षा ज्ञानच त्यांच्या शोधात होते, असे म्हणावे लागते. त्यांच्या मनात असते तर, ज्ञानाच्या क्षेत्रातील इतरही अनेक पदव्या अशाच सहजगतीने निश्चित मिळविल्या असत्या. त्यांचे बहुतांशी शिक्षण शिष्यवृत्तींच्या आणि राजांच्या आर्थिक मदतीने पूर्ण झाले आहे.

<u>विवाह</u> :-

डॉ. आप्पासाहेब पवारांच्या विवाहाचा वृत्तांतही मनोवेधक आहे. कोल्हापूरातील मराठा समाजातील एक नामवंत व्यापारी म्हणून बाळाजी उर्फ बळवंतराव सखाराम शिंदे यांची बरीच ख्याती होती. त्यांनी व्यापारात चांगला जम बसविला होता. तरी, त्यांचा कल बहुजन समाजात शिक्षण प्रसार करण्याकडे अधिक होता. त्यामुळे त्यांनी डी.आर.भोसले यांची पोलिस खात्यातून कोल्हापूरास आल्यावर ओळख करुन घेतली होती. त्यांना दोन मुली होत्या. त्या विव्दानांच्या घरी जाव्यात असे त्यांना वाटत होते. म्हणूनच ते आपल्या मुलीसाठी एखादा हुषार मुलगा शोधत होते. याच सुमारास डॉ. आप्पासाहेब पवार एल्एल्.बी. झालेले होते आणि ते उच्च शिक्षणासाठी परदेशी जाण्याच्या तयारीत होते. ही गोष्ट बळवंतराव शिंदे यांना समजली. त्यांनी आपल्या मुलीसाठी

डॉ. आप्पासाहेब पवार यांचा विचार केला. तेव्हा, हा मुलगा अत्यंत हुषार आहे, तो उच्च शिक्षण घेऊन परत आल्यावर तुमच्या मुलीशी लग्न करण्याचे अभिवचन देत असेल तर, त्याच्या उच्च शिक्षणासाठी मदत करण्यास हरकत नाही, असे डी.आर.भोसले यांनी बळवंतराव शिंदे यांना सांगितले. बळवंतराव शिंदे यांनी तात्काळ पाच हजार रुपये देऊन डॉ. आप्पासाहेब पवार यांना उच्च शिक्षणासाठी परदेशी पाठवून दिले.[13]

बळवंतराव शिंदे यांनी आर्थिक मदत देऊन डॉ. आप्पासाहेब पवार यांना परदेशी पाठविले, पण एवढी मोठी पदवी घेऊन हा मुलगा परत आल्यावर आपल्या मुलीशी लग्न करील की नाही, अशी शंका त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यांनी ही शंका डी.आर.भोसले यांना एक--दोनदा बोलून दाखविली होती. डॉ.आप्पासाहेब पवार यांच्यासाठी इतरांनीही प्रयत्न चालविल्याचे डी.आर.भोसले ऐकून होते. बळवंतराव शिंदे यांना दिलेल्या वचनाचा भंग करुन, डॉ. आप्पासाहेब पवार इतरांच्या प्रयत्नाला बळी पडले असते तर, त्यांना भरपूर पैसेही मिळाले असते.

पण डॉ. आप्पासाहेब पवार कोणत्याही मोहाला बळी पडले नाहीत. त्यांनी बळवंतराव शिंदे यांना दिलेले वचन पाळले. 1935 मध्ये परदेशातून परत आल्यावर, त्यांनी बळवंतराव शिंदे यांची कन्या सुशिला हिच्याशी विवाह केला.[14] सौ. सुशिलाबाई पवार यांनी विवाहानंतर त्यांच्या पतीचे विशाल कार्यक्षेत्र समजावून घेतले. आयुष्यभर पतीला समर्थपणे साथ दिली. डॉ.आप्पासाहेब पवार यांच्या आयुष्यात सौ. सुशिलाबाई पवार यांचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्याकडून सतत मिळणाऱ्या प्रोत्साहानामुळे व सहकार्यामुळेच डॉ. आप्पासाहेब पवार त्यांच्या कार्यक्षेत्रातील यशोमंदिराच्या पाय-या आत्मविश्वासाने चढू शकले, असे म्हटले तर ते चूक होणार नाही.

<u>**शैक्षणिक कार्य**</u> :--

1935 मध्ये, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर येथे इतिहास व अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून डॉ.आप्पासाहेब पवार यांनी आपल्या शैक्षणिक जीवनाला सुरुवात केली. अत्यंत नामवंत प्राध्यापकांनी गजबजलेल्या या महाविद्यालयात, त्यांनी बघता-बघता आपला प्रभाव टाकला. ते विद्यार्थ्यांच्या गळयातील ताईत झाले.

1945 मध्ये, ते याच महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी विराजमान झाले. त्यांनी राजाराम महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये स्वतःला झोकून दिले. महाविद्यालय नावारुपाला आणले.

1949 साली त्यांची गुजरातमधील विसनगरच्या एम्.एन्.कॉलेजच्या प्राचार्यपदी बदली झाली. भिन्न भाषा, भिन्न प्रांत इ. अनेक अडचणी होत्या. तरीही त्यांनी या अडचणींवर मात करीत एम्.एन्.कॉलेज भक्कम पायावर उभे केले. तेथील लोकांना ते "आपले"च वाटावेत इतके त्यांनी लक्षणिय कार्य केले.

1952 साली त्यांची पुण्यास शिक्षण उपसंचालक म्हणून नियुक्ती झाली. त्यांच्या क्षमतांना व्यापक क्षितिज मिळाले. त्यांच्या प्रशासकीय कार्यक्षमतेची कसोटी सुरु झाली. या कसोटीतही ते यशस्वी झाले. एक सृजनशील, उमद्या मनाचा व शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ते ओळखले जाऊ लागले.

1954 साली त्यांची एस्.एस्.सी. बोर्डाचे अध्यक्ष म्हणून निवड करुन सरकारने त्यांच्या प्रशासकीय कार्यक्षमतेला अधिक वाव दिला. अध्यक्ष या नात्याने त्यांनी एस्.एस्.सी. बोर्डाच्या कार्यपध्दतीमध्ये अमूलाग्र व मूलगामी सुधारणा केल्या. शिस्तबध्द व कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा उभी केली. आजही त्यांनी घालून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार बोर्डाचे काम चालू आहे. यावरुन त्यांची दूरदृष्टी व कामातील निर्दोषपणा दिसून येतो.

1958 साली ते जुन्या मुंबई राज्याचे शिक्षण सहसंचालक झाले. त्यांनी "ज्ञानगंगा घरोघरी" पोचविण्यासाठी अपार कष्ट घेतले. खेडोपाडी ज्ञानमंदिरे उभी करण्यास प्रोत्साहन दिले. बहुजन समाजासाठी ज्ञानाची कवाडे खुली केली.

त्यानंतर एका वर्षातच म्हणजे 1959 साली ते जुन्या मुंबई राज्याचे शिक्षण संचालक झाले. भाषावार प्रांत रचनेच्या धोरणानुसार 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर ते 1960 साली महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक झाले. शिक्षण संचालक म्हणून काम करीत असताना त्यांच्या कर्तृत्वाला उत्तुंग क्षेत्र लाभले. आता त्यांनी अधिक जोमाने व गतीने ग्रामीण भागात शिक्षणाचे जाळे विणायला सुरुवात केली. अनेक धाडसी व क्रांतीकारक निर्णय घेऊन, त्याची परिणामकारकरित्या अंमलबजावणी केली. सुरुवातीला जुन्या मुंबई राज्याच्या आणि नंतर महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये महत्वाचा वाटा उचलला.

1962 साली त्यांची कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु म्हणून तीन वर्षासाठी नियुक्ती करण्यात आली. आणि त्यांच्याकडे शिवाजी विद्यापीठ उभारणीची संपूर्ण जबाबदारी

सोपविण्यात आली. त्यांनी ही जबाबदारी इतकी शीघ्रतेने आणि उत्तमरितीने पार पाडली की, सलग चार वेळा त्यांना कुलगुरु म्हणून मुदतवाढ देण्यात आली. सलग तेरा वर्षे ते या पदावर होते. त्यांनी या काळात एका ओसाड, दगडधोंडयांनी भरलेल्या, निर्जन अशा सागरमाळावर एक भव्य–दिव्य, दक्षिण काशीच्या वैभवात भर घालणारे ज्ञानमंदिर -- शिवाजी विद्यापीठ उभे केले. शिवाजी विद्यापीठाला एक महत्वाचे प्रादेशिक विद्यापीठ म्हणून नावलौकिक मिळवून दिला. शिवाजी विद्यापीठाची उभारणी हा तर त्यांच्या असामान्य कर्तृत्वाचा अत्युच्य मानबिंदू होय. विद्यापीठ हेच त्यांचे खरे चिरंतन स्मारक होय. 'शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार' म्हणून डॉ. आप्पासाहेब पवार यांचे नाव अभिमानाने घेतले जाते.

1965 साली त्यांची भारत--श्रीलंका आंतरविद्यापीठ महामंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य म्हणून निवड झाली.[15] फेब्रुवारी 1971 मध्ये, त्यांची या महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाली.[16] आंतरराष्ट्रीय पातळीवर आंतरविद्यापीठ क्षेत्रात हा मान शिवाजी विद्यापीठालाच प्रथम मिळाला. महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या कुलगुरुंना या महामंडळाच्या अध्यक्षपदाचा मान क्वचितच मिळाला आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठात सर्वात नवीन अशा शिवाजी विद्यापीठाला हा सन्मान डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या रुपाने मिळाला. त्यामुळे विद्यापीठाने केलेल्या कार्यासही भारतीय स्तरावर मान्यता प्राप्त झाली.[17]

याशिवाय, कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांनी अखिल भारतीय स्पर्धा परीक्षा समिती, महाराष्ट्र राज्य विद्यापीठ विद्यार्थी कल्याण मंडळ, उपलब्ध साधन सामग्री गुणवत्ता वाढ समिती इ. विविध समित्यांचे अध्यक्ष म्हणून, तर छत्रपती शिवाजी महाराज जन्मतिथी समिती, ऐतिहासिक अभ्यास समिती, पुनर्ररचित महाराष्ट्र समाज शिक्षण समिती, पुराभिलेख व पुरातत्व मंडळ इ. अनेक समित्यांचे सदस्य म्हणून अत्यंत मोलाचे कार्य केले आहे.[18]

एक "कुलगुरु" म्हणून शिवाजी विद्यापीठाची बाहय व आंतरिक उभारणी अल्पावधीत पूर्ण करीत असतानाच, एक "इतिहासाचा अभ्यासक"व "संशोधक" म्हणून मराठा इतिहासातील अत्यंत दुर्मिळ व महत्वाची कागदपत्रे संपादित करुन, विद्यापीठामार्फत प्रकाशित करण्याचे एक महान कार्य त्यांनी केले. त्यांच्यामुळेच ताराबाईकालीन कागदपत्रांचे तीन खंड, जिजाबाईकालीन कागदपत्रांचा एक खंड, ताराबाईकालीन फारशी पत्रव्यवहार, मराठा इतिहासातील अभ्यासाचे दोन खंड, छत्रपती राजर्षि शाहू

महाराजांच्या कागदपत्रांचा एक खंड, त्यांचे विविध विषयावरील अभ्यासपूर्ण लेख, इ. मौलिक स्वरुपाची ग्रंथसंपदा मराठा इतिहासाभ्यासकांना व संशोधकांना उपलब्ध झाली आहे.

एक 'विचारवंत व शिक्षणतज्ञ" म्हणून त्यांनी विविध ठिकाणी, विविध विषयावर दिलेली व्याख्यानेही मौलीक व विचारप्रवर्तक आहेत.

याशिवाय, महाराष्ट्रातील महत्वाच्या समस्यांवरील अनेक समित्यांवरही त्यांनी भरीव कार्य केले आहे.

शैक्षणिक, सामाजिक, ऐतिहासिक, संशोधन, प्रशासन इ. विविध क्षेत्रांत चौफेर अवगाहन करणारी त्यांची बुध्दीमत्ता पहिली म्हणजे आपल्याला अचंबा वाटल्याशिवाय राहत नाही. विविध विषय हाताळण्याच्या त्यांच्या कौशल्याचे कौतुक वाटते. गाढव्यासंग, सूक्ष्म अवलोकन, सखोल संशोधन, उदंड प्रयत्न, अमाप उत्साह, निःस्वार्थीपणा, बहुजन समाजाच्या शिक्षणाची व उत्थानाची तळमळ, इ.मुळे त्यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक परिवर्तनामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे.

प्राध्यापकापासून प्राचार्यापर्यंत, शिक्षण उपसंचालकापासून शिक्षण संचालकापर्यंत आणि तेथून एका विद्यापीठाच्या कुलगुरुपदापर्यंत त्यांनी अनेक महत्वपूर्ण व जबाबदारीची पदे भूषविली. प्रत्येक ठिकाणी त्यांनी स्वतःला कामात झोकून दिले. ते सर्वार्थाने कामाशी एकजीव झाले. आपल्या कार्य–कर्तृत्वाव्दारे प्रत्येक पदाचे चीज केले. आपल्याला मिळालेल्या प्रत्येक संधीचा समर्थ वापर करुन, शैक्षणिक क्षेत्रातील एक अधिकारी समाजासाठी निरंतर कार्य करु शकतो, हे त्यांनी प्रत्यक्ष कृतीने दाखवून दिले.

कोणतेही काम अत्यंत निष्ठेने, चिकाटीने, निष्कामबुध्दीने आणि निरलसपणे पूर्ण करणे, हे त्यांच्या जीवनाचे मूलभूत सूत्र होते. त्यांच्या आयुष्यात आळस, निराशा, कामचुकारपणा याला अजिबात वाव नव्हता. कार्यालयीन व्यवस्था अत्यंत चोख ठेवूनही, त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांची मने जिंकली होती. एक "माणूस" म्हणूनही ते श्रेष्ठ होते. ते कोल्हापूरचे सुपुत्र असले तरी, त्यांचे कर्तृत्व केवळ कोल्हापूरपुरतेच मर्यादित नव्हते. त्यांनी महाराष्ट्रातच नव्हे तर, संपूर्ण भारतात शैक्षणिक क्षेत्राची बहुमोल सेवा केली आहे. ते ज्या समाजात जन्मले आणि वाढले, त्या बहुजन समाजाला सुशिक्षित, सुबुध्द आणि सुशील करण्यासाठी त्यांनी अव्याहत् परिश्रम घेतले आहेत. या कर्मयोग्याचे, ज्ञानतपस्वीचे, शिक्षणमहर्षिचे नेत्रदिपक कार्य सुवर्णाक्षरांत लिहून ठेवावे असेच आहे. डॉ.अप्पासाहेब पवार हे "करवीरच्या मातीने मोहोरलेले" कर्तृत्व म्हणून सदैव ओळखले जाईल यांत शंका नाही.[19]

**निधन** :--

डॉ. आप्पासाहेब पवार 19 जानेवारी 1975 रोजी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदावरुन निवृत्त झाले. निवृत्तीनंतर त्यांनी महाराष्ट्रातील सामाजिक क्रांतीचे आद्यप्रणेते राजर्षि शाहू महाराज यांच्या ऐतिहासिक कामगिरीचे संशोधन करण्याची योजना आखलेली होती. त्यानुसार त्यांनी कुलगुरु पदाच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षी (1974-75) कोल्हापूर रेकॉर्ड ऑफिस, मुंबईतील पुराभिलेख संग्रह, इंडिया ऑफिस, लंडन येथून शाहू महाराजांसंबंधीची कागदपत्रे जमा करण्याचे काम हाती घेतले होते. तसेच बहुजन समाजाच्या चळवळीस उपयुक्त असणारी सर्व कागदपत्रे एकत्र करुन, ती अभ्यासकांना उपलब्ध करुन देण्याची त्यांची एक महत्वाकांक्षी योजना होती.

परंतु दुर्दैवाने त्यांच्या प्रकृतीने साथ दिली नाही. त्यांना पाठीच्या मणक्यांचा त्रास सुरु झाल्याने, ते शारीरिकदृष्टया कमालीचे खचले. त्यांच्या पायातील शक्ती नष्ट झाली. शेवटी ते विकलांग झाले. विद्यापीठ अधिका-यांकडूनही त्यांना योग्य ते सहकार्य मिळाले नाही. "शाहू संशोधन केंद्र" विद्यापीठाच्या स्वाधीन करुन, त्यांनी कोल्हापूरचा कायमचा निरोप घेतला. ते पुण्यास येऊन स्थायिक झाले. ते पुन्हा कधीच कोल्हापूरला आले नाहीत.

डॉ. आप्पासाहेब पवार यांना 21 डिसेंबरला रक्तदाबावर उपचार करुन घेण्यासाठी इस्पितळात दाखल करण्यात आले होते. शिवाजी विद्यापीठाचे शिल्पकार, इतिहासाचे गाढे व्यासंगी आणि लोकप्रिय माजी कुलगुरु डॉ. आप्पासाहेब गणपतराव पवार यांचे 30 डिसेंबर 1981 रोजी सकाळी 9.30 वाजता पुण्याच्या के.ई.एम्. इस्पितळात प्रदीर्घ आजाराने दु:खद निधन झाले.[20] ते 76 वर्षांचे होते. अनेकांच्या जीवनात ज्ञानज्योत लावलेली ही मूलाधार ज्योत कायमची मालवली. एक अत्यंत सौजन्यशील, कष्टाळू, निरलस, निरपेक्षवृत्तीचा कर्मयोगी अनंतात कायमचा विलिन झाला. त्यांच्या निधनाने शैक्षणिक क्षेत्रात कधीही भरुन न येणारी पोकळी निर्माण झाली. त्यांच्या पश्चात् पत्नी, पाच मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे.

***

## – संदर्भ साधने –


1. दै. पुढारी, 4 मे 1966, कोल्हापूर, पृ.4.

2. पाटील,व्ही.टी. : डॉ. आप्पासाहेब पवार सत्कार समारंभ, 1968, पृ. 41.

3. दै. पुढारी, 4 मे 1966, कोल्हापूर,पृ.4.

4. Ithape, Usha: Dr.A.G. Pawar Vice-Chancellor, Shivaji University, A biographical Sketch, Studies in Indian History, Felicitation Vol., Edited by Dr.V.D. Rao, P.Xi.

5. कित्ता.

6. बागल,भाई माधवराव : डॉ. आप्पासाहेब पवार, डॉ. आप्पासाहेब पवार जीवन–दर्शन गौरव अंक, 1968, पृ.43.

7. दै. पुढारी, 4 मे 1966, कोल्हापूर, पृ.4.

8. Ithape, Usha : Dr.A.G. Pawar, Vice-Chancellor, Shivaji University, A Biographical Sketch, Studies in Indian History, Felicitation Vol., Edited by Dr.V.D. Rao, P. Xii.

9. कित्ता.

10. दै. पुढारी, 4 मे 1966, कोल्हापूर, पृ.4.

11. Ithape, Usha : Dr.A.G. Pawar, Vice-Chancellor, Shivaji University, A Biographical Sketch, Studies in Indian History, Felicitation Vol., Edited by Dr.V.D. Rao, P. Xii.

12. कित्ता.

13. भोसले,डी.आर. : स्थितप्रज्ञ -- डॉ.पवार, डॉ. आप्पासाहेब पवार जीवन–दर्शन गौरव अंक, 1968, पृ. 143.

14. नसिराबादकर,ल.रा. : राजर्षि शाहू छत्रपतींचा सच्चा चेला, शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार, डॉ.आ.ग.पवार पुतळा समिती, 1989, पृ.4.

15. Ithape, Usha: Dr.A.G. Pawar Vice-Chancellor, Shivaji University, A Biographical Sketch, Studies in Indian History, Felicitation Vol. Edited by Dr.A.D. Rao, P. Xiv.

16. शिवसंदेश त्रैमासिक, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, जानेवारी-मार्च 1973, पृ. 24.

17. कित्ता.

18. माने, डी. टी. : डॉ. आप्पासाहेब पवारांच्या कर्तृत्वाचा एक समर्थ पैलू, साप्ताहिक प्रहार -- शिक्षण महर्षि डॉ. आप्पासाहेब पवार गौरव अंक, ऑक्टोबर 1973, पृ. 49.

19. मोरे, विलासराव द. : करवीरच्या मातीने मोहोरलेले व्यक्तिमत्व -- डॉ. आप्पासाहेब पवार, कोल्हापूरची मोठी माणसे, पृ. 155.

20. दै. पुढारी, 31 डिसेंबर 1981, कोल्हापूर, पृ. 1.

***
|||